N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** कोरपना

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0210 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/07/2023 20:29

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 11/07/2023

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/07/2023

**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/07/2023 **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 028

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/07/2023 20:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय कोरपना ,कोरपना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शामराव अर्जुन मुके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1942

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वार्ड क्र 13कोरपना ,कोरपना,कोरपना,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वार्ड क्र 13कोरपना ,कोरपना,कोरपना,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय बापुराव कुळमेथे | | | 1. तलाठी साजा पारडी ,कोरपना, कोरपना,कोरपना,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ध्वनी उपकरणे | 2 सॅन्डीस्क कंपनीचे 32 GB क्षमता असलेले मेमोरीकार्ड | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

0.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 12/07/2023 मी शामराव अर्जुन मुके, वय 81 वर्षे, व्यवसाय- से.नि. वनपाल, रा. वार्ड नं. 13, कोरपणा, ता. कोरपणा, जि. चंद्रपूर येथे राहत असुन दि. 11/07/2023 रोजी श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर, हे स्टाफसह षासकीय वाहनाने मौजा कोरपणा येथे आल्याने त्यांचे समक्ष लोकसेवकाविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे. "सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वर नमुद पत्त्यावर आपले परिवारासह राहतो व वनविभागातून वनपाल या पदावरून सन 2000 मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. माझी दिवंगत पत्नी नामे शांताबाई शामराव मुके हिचे नावानी शेतजमीनी विकत घेतल्या, त्या शेतीवर माझे मुलं नामे 1) सुरेश शामराव मुके 2) रमेश शामराव मुके दोन्ही त्यावेळी अज्ञान यांचे नावे सुध्दा त्या शेतजमिनीवर नमुद करण्यात आले होते. त्यांनतर माझी पत्नी हि सन 2016 मध्ये मरण पावल्यामुळे माझे दोन्ही मुले सज्ञान झाल्यामुळे मोठा मुलगा 1) सुरेश शामराव मुके यांचे नावे सव्र्हे नं 98/1 मध्ये 2.5 हे.आर. व लहान मुलगा 2) रमेश शामराव मुके यांचे नावे सव्र्हे नं 98/2 मध्ये 2.4 हे.आर. शेतजमीन नावे करण्यात आली होती. त्यानंतर दोन्ही सर्व्हे नं मधील शेतजमीन ही भोगवटदार वर्ग-2 मध्ये असल्याने सदर दोन्ही शेतजमीन भोगवटदार वर्ग-1 मध्ये करण्याकरिता मी माझे दोन्ही मुलांचे नावांनी अर्ज तयार करून त्यांची सही घेवून स्वतः दिनांक 03/01/2023 रोजी सर्व आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह मा. उपविभागीय अधिकारी राजुरा यांना तहसिलदार कोरपना यांचे मार्फतीने तहसील कार्यालय कोरपणा येथे अर्ज सादर केला. सदर प्रकरणाचा पाठपुरावा मी स्वतः केला. त्यानंतर तहसील कार्यालय कोरपणा येथुन सदर शेतजमिनीचे वर्ग-1 मध्ये करण्याबाबत त्रुटी दर्षविली असता त्या त्रुटींची पुर्तता करून परत सादर केले. सदर कामासंदर्भात मी स्वतः दि. 05/07/2023 व 07/07/2023 रोजी तहसील कार्यालय कोरपणा येथे गेलो व संबंधीत लिपीकाला भेटलो परंतु माझे काम झाले नाही. त्यानंतर मी काल दिनांक 10/07/2023 रोजी तहसिल कार्यालय कोरपणा येथे गेलो व संबंधीत लिपीकाला पुन्हा विचारणा केली असता त्यांनी माझे काम झाले नसल्याचे सांगितले. तेव्हा तेथे उपस्थित असलेले गैरअर्जदार श्री. कुळमेथे, कोतवाल हे मला भेटले व मला माझे कामाबाबत विचारणा केली व माझे शेतीचे वर्ग-2 मधुन वर्ग-1 मध्ये करण्याचे शेतीचे काम मी करून देतो त्याकरिता तुम्हाला नायब तहसीलदार श्री. चिडे साहेब यांचेकरीता 2,000/-रू. द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली. तुम्ही जर 2,000/-रू दिले नाहीत तर तुमचे काम होणार नाही असे म्हणाल्याने मी नाईलाजास्तव होकार देवुन मी उद्याला येवुन भेटतो असे म्हणुन तेथून निघून आलो. माझी गै.अ. कुळमेथे कोतवाल यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी दिनांक 10/07/2023 रोजी अंदाजे दुपारी 12/30 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्रीमती भोसले मॅडम यांना फोन करून सर्व हकिकत सांगितली. त्यावरून श्रीमती भोसले मॅडम यांनी आज दिनांक 11/07/2023 रोजी मला मौजा कोरपणा येथील सुरक्षित स्थळी 10/00 वा. दरम्यान सदर शेतीच्या कामासंबंधाने सर्व कागदपत्रे घेवुन हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यावरून मी आज दिनांक 11/07/2023 रोजी मी व माझा मित्र श्री. कारेकार यांचे दुचाकी वाहनाने मौजा कोरपणा येथील मेन रोडजवळील दत्त मंदीराजवळ शेतीचे सर्व कागदपत्रे घेवुन हजर झालो. माझा गैरअर्जदार यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. गैरअर्जदाराने मागणी केलेली रक्कम मी माझे वैयक्तिक बचतीतुन जमा केलेले 2,000/-रू. आपणाकडे लाचरक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी माझे तक्रारीवरुन माझे दोन्ही मुलांचे नावे असलेल्या शेतजिमीनीचे भोगवटदार वर्ग-2 मधुन भोगवटदार वर्ग-1 मध्ये करून देण्याच्या कामाकरिता 2,000/-रू. ची लाच मागणारे गैरअर्जदार श्री. कुळमेथे कोतवाल यांचेविरुध्द कार्यवाही होणेस विनंती आहे." याप्रकारची लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले मॅडम यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टाफची व पंचांची ओळख करुन दिली. श्रीमती भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व श्रीमती भोसले मॅडम यांनी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कष्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्रीमती

भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मी जमा केलेली सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी रक्कम 2,000/- रू. ज्यामध्ये 500/-रू. दराच्या 4 चलनी नोटांचे क्रमांक नोंदवुन घेतले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षीक करून दाखविले. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 श्रीमती भोसले मॅडम यांनी तयार केला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मला पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. श्रीमती भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करून व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मित्र श्री. कारेकार यांच्या मोटार सायकल क्र. एम.एच. 34 ए. वाय. 7248 नी पंच क्र. 01 यांचेसह तहसील कार्यालय कोरपणा येथे पडताळणी करीता पाठविले. पडताळणी कारवाई दरम्यान मी सर्वप्रथम नायब तहसीलदार श्री. चिडे साहेब यांना भेटलो व माझे कामाबाबत बोलणी केली असता त्यांनी सदरचे काम ''दुसरे नायब तहसीलदार यांचेकडून करून घ्यायला हवे होते, मी जिवतीला होतो'' असे म्हणाले व त्यांचे लिपीक रामटेके बाबुना बोलावुन त्यांना ''वरच्या साहेबाकडे पाठवाच ना सह्या घ्याले'' असे सांगितले. त्यानंतर मी नायब तहसीलदार यांचे कक्षाचे बाहेर आलो असता मला गै.अ. श्री. कुळमेथे, कोतवाल भेटले व मला म्हणाले की, ''त्यांची चालत नाही बर अहवालावर, कारण का त्याच्यावर चिडे साहेबाच नाव आहे. त्यांची सही कशी एक्सेप्ट होईल.'' असे म्हणाले असता त्यावर मी त्यांना ''आठ नउ महीने झाले'' असे म्हणालो असता गै. अ. कुळमेथे, कोतवाल यांनी मला'' नाही आमचे दिड-दिड वर्श झाले. तुम्ही आठ-नउ महिणे म्हणता तरी आम्ही पैसे देवून करतो कराले त आम्हालेही आहे.'' असे म्हणाले. त्यावर मी ''तसं आम्हालाही सांगा'' असे म्हणालो असता गै.अ. कुळमेथे, कोतवाल यांनी ''सांगीतले ना तुम्हाले त्यादिवशी तुम्हाले. तुम्ही द्यायलास तयार नाही. तुमच सुटतस नाही ह्यातुन तर मग माझ काम करा म्हणतां'' असे म्हणाले. तसेच त्यांनी मला सांगितले की, ''इथसं घेते साहेब, अन वरचा बी साहेब घेते. जवा हे राजु-याले पाठवते न तेव्हा. आता दे देन घेण झालनं.'' त्यावर मी ''एका मानसाला किती खर्च येणार मग, अंदाजे येथे दोन हजार म्हणाले तुम्ही, तिथे त्यांच्याकडे'' असे म्हणालो असता त्यांनी मला सांगितले की, ''त्यांच्याकडेही तेवढेस, तिथेही तेवढेस.'' ''प्रोसेस आहे. ते हे दिल्याशिवाय फटाफट काही काम होत नाही.'' असे म्हणुन माझ्या दोन्ही मुलांच्या नावे भोगवटदार वर्ग-2 मध्ये असलेल्या शेतजमीनी भोगवटदार वर्ग-1 मध्ये करून देण्याच्या कामाकरीता वरिष्ठांच्या नावाने श्री. कुळमेथे, कोतवाल यांनी तक्रारदार यांचेकडे 2000/- रू. लाचेची मागणी केली. सदर लाच रक्कम मी थोड्या वेळात आणुन देतो असे म्हणुन मी तेथुन माझे मित्राचे मोटार सायकलने पंचासह ला.प्र.वि. चे लोक थांबुन असलेल्या ठिकाणी निघुन आलो. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणी करून आल्यानंतर अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करून संभाशणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता श्री. कुळमेथे यांनी माझ्या दोन्ही मुलांच्या नावे भोगवटदार वर्ग-2 मध्ये असलेल्या शेतजमीनी भोगवटदार वर्ग-1 मध्ये करून देण्याच्या कामाकरीता वरिश्ठांच्या नावाने 2000/- रू. लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून गै.अ. कुळमेथे, कोतवाल यांचेविरुध्द लाच सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य ईशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास सोहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळापुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. सापळापुर्व अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर मला अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आली. सापळा कार्यवाहीच्या

देणी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन कोतवाल कुळमेथे यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळ्यातील पांढ-या रंगाचा दुपट्टा काढुन उजव्या हातात ठेवून ईशारा करण्याबाबत मला सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक भोसले मॅडम यांचे सुचनेवरून पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करून व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मित्र श्री. कारेकार यांचे मोटार सायकलने पंच क्र. 1 यांचेसह तहसील कार्यालय कोरपणा येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग षासकीय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 तहसील कार्यालय कोरपणा चे गेटचे आत गेलो असता गै.अ. कुळमेथे, कोतवाल हे तहसील कार्यालयात हजर नव्हते. त्यामुळे मि नियोजीत ठिकाणी परत येवुन सदर हकिकत भोसले मॅडम यांना सांगितली. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळानंतरची अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. भोसले मॅडम यांनी दि. 11/07/2023 रोजीची कार्यवाही स्थगित ठेउन पुढील कार्यवाही बुधवार दि. 12/07/2023 रोजी करण्याचे ठरवुन गोपणीयता बाळगण्याचे सुचना देउन लाच रक्कमेचा लिफाफा भोसले मॅडम यांनी आपले ताब्यात ठेवले.(उर्वरित फीर्याद मुळ फीर्यादि प्रमाने )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDIP UTTAMRAO EKADE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANDIP UTTAMRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

ठाणे अंमलदार
पो.स्टे. कोरपना

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**